# <u>राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक</u>

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र.रामाआ/नाशिक/तक्रार क्र. : २९६/२०१८/अहमदनगर**

१ श्री. संजयकुमार दादासाहेब कुलकर्णी, : तक्रारदार
रा.समृध्दी निवास, केशर मंगल कार्यालय रोड,
मु.पो.ता.राहुरी, जि.अहमदनगर-४१३७०५.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा, : प्रतिवादी
उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद कार्यालय, अहमदनगर,
ता.जि.अहमदनगर.

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा, : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद कार्यालय, अहमदनगर,
ता.जि.अहमदनगर.

**<u>सुनावणी दिनांक - १८/०९/२०१९</u>**

तक्रारदार यांनी दिनांक १४/०८/२०१८ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक १८/०९/२०१९ रोजी सुनावणीसाठी तक्रारदार अनुपस्थित होते. तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित होते. विद्यमान जन माहिती अधिकारी यांचेतर्फे प्रतिनिधी उपस्थित होते.

तक्रारदार यांनी त्यांच्या दिनांक १४/०८/२०१८ रोजीच्या तक्रार अर्जात नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक ०६/०५/२०१५ रोजीच्या माहिती अर्जासंदर्भात आयोगाने द्वितीय अपील क्रमांक ३२४८/२०१५/अहमदनगर वरील निर्णय दिनांक १८/०१/२०१८ अन्वये पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत. “विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०६/०५/२०१५ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात रोजनिशी/दैनंदिनीची कार्यालयातील उपलब्ध माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामूल्य पुरवावी.” तथापि, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशानुसार माहिती पुरविली नसल्याचे तक्रारदार यांनी सदर तक्रार अर्जात नमूद केले आहे.

सुनावणीदरम्यान तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, आयोगाच्या द्वितीय अपील क्रमांक ३२४८/२०१५/अहमदनगर वरील निर्णय दिनांक १८/०१/२०१८ रोजीच्या पारित आदेशास अनुसरुन तक्रारदारास

दिनांक ०१/०४/२०१९ रोजीच्या पत्रान्वये १ ते ७७ पांनाची माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने माहिती पुरविली आहे. त्याची स्थळप्रत आयोगास सादर करीत आहे.

सुनावणीदरम्यानचा युक्तीवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून येते की, आयोगाच्या उपरोक्त नमूद द्वितीय अपील क्रमांक ३२४८/२०१५/अहमदनगर वरील निर्णय दिनांक १८/०१/२०१८ रोजीच्या आयोगाच्या पारित आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्यानुसार तक्रारदार यांना कार्यालयातील उपलब्ध माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामूल्य पुरविल्याचे स्पष्ट होते. तशी तक्रारदार यांना नोंदणीकृत पोचदेय डाकेने माहिती पुरविल्याची स्थळप्रत आयोगास सादर केली आहे. यावरुन विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे दिसून येत नाही, ही बाब विचारात घेता तक्रार निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. त्यामुळे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य असून प्रस्तुत तक्रारीत काहीही तथ्य नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

तक्रार क्रमांक २९६/२०१८/अहमदनगर निकाली काढण्यात येत आहे.

**(के.एल.बिश्नोई)**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक